नं १० म. ग्रं. सं. ठाणें

विषय भा. व्याकरण

लेखक

सन १८५६

ग्रंथालय क्रमांक ११६

पुस्तकाचें नांव बाळ व्याकरण

१०
सं.क. ११६

बाळ व्याकरण.

(भाषा व्याकरण)

# बालव्याकरण

# बालव्याकरण

हा ग्रंथ शाळांत पढणा
ऱ्या लहान मुलांस परम
प्रीतीनें नजर केला असे

पुणें ज्ञान प्रकाश छापखान्यांत छापिला.

आवृत्ती पहिली.

शकें १७७७

सन् १८५६

# प्रस्तावना

आलिकडे सरकारानें उदार पणें करून ह्या मुंबई इलाख्यांत बहुत मराठी शिकण्याच्या शाळा जागोजागीं घालून ह्या देशांतील मुलांस उपयोगी विद्याभ्यास होण्याचें काम चालविलें आहे. तसेंच आणखीही कोणीं कोणीं परोपकारी गृहस्थांच्या आश्रया खालीं विद्याभ्यासाचें काम वृद्धि पावत आहे. त्याजवरून ह्या देशांतील लोकांचें कल्याण इच्छिणारे जे आहेत त्यांस पूर्ण भरवसा आहे कीं, हें काम उत्तरोत्तर अधिक अधिक वाढून सर्व श्रीमंत, गरीब, लहान, मोठे ह्यांच्या मुलांची मनें विद्याभ्यासाकडे लागतील, आणि त्यां-

स ज्ञान उत्पन्न होईल. हें कार्य करण्या
स यथाशक्ति साहित्य करूं लागावें हास
र्वांचा धर्म होय.

असा विचार मनांत आणून शाळं
तील लहान मुलांस प्रथम व्याकरणांतील
रव्य विषयाचें सहज ज्ञान व्हावें त्या बुद्धीनें हे
बालव्याकरण करून मुलांस नजर केलें
आहे. आणि साहा सात वर्षांच्या मुलांस ही स
मजावें म्हणून हें सुलभ शब्दांनीं लिहिलें अ
हे, त्यास्तव याचा अभ्यास मुलांनीं करून मो
व्याकरण पाहिलें असतां त्यांस तें सुबोध
होईल. नंतर संस्कृत, इंग्रेजी किंवा दुसरी को
णती भाषा शिकण्यास त्यांस कांही श्रम
उणार नाहींत; आणि कोणताही विषय ग्र

ण करण्याची शक्ति येईल.

हा ग्रंथ मुलांस व्याकरणाच्या मूळ बीजाचें ज्ञान होण्यास उपयोगीं पडूं लागला हें श्रवण करावयाजोगें भाग्य जर ह्या ग्रंथकाराचें असेल तर त्याचा मनोरथ पूर्ण होईल.

# महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

प्र० व्याकरण म्हणजे काय?

उ० व्याकरण म्हणजे शुद्धरीतीनें बोलणें आणि लिहिणें याची विद्या आहे.

प्र० व्याकरणांत काय सांगितलें आहे?

उ० व्याकरणांत वर्ण आणि शब्द यांचा विचार सांगितला आहे.

प्र० वर्ण किती आहेत?

उ० वर्ण बावन्न आहेत, अ, आ, इ, ई, पासून क्ष पर्यंत.

प्र० वर्णांत भेद किती आहेत?

उ० स्वर आणि व्यंजनें असे दोन भेद आहेत.

प्र० स्वर किती आणि व्यंजनें किती

आहेत?

उ० अ, आ इत्यादी १६ स्वर, आणि क, ख इत्यादी ३६ व्यंजनें आहेत. (ह्या सर्व स्वरांचा आणि व्यंजनांचा शिष्यानें उच्चार करून दाखवावा.)

प्र० स्वराचे भेद किती आहेत?

उ० ह्रस्व, दीर्घ, आणि संधिस्वर, असे तीन भेद आहेत. अ, इ, उ, ऋ, ऌ हे ह्रस्व स्वर, आ, ई, ऊ, ॠ, ॡ, हे दीर्घ स्वर; आणि ए, ऐ, ओ, औ, हे संधि स्वर होत. अं यास अनुस्वार आणि अः यास विसर्ग असें म्हणावें.

प्र० दोन अथवा तीन वर्ण एकत्र मिळाले असतां त्यास काय म्हणावें?

उ० त्यांस अक्षर असें म्हणावें.

प्र० तीं अक्षरें एक किंवा दोन चार एक

त्रितकाली म्हणजे त्यास काय म्हणावें?

उ० त्यांस शब्द असें म्हणावें.

# शब्द

प्र० शब्द म्हणजे काय?

उ० ज्यां अक्षरां पासून कांहीं अर्थ सम

जतो त्यां अक्षरांस शब्द असें म्ह

णावें

प्र० शब्दांचे भेद किती आहेत?

उ० नाम, सर्वनाम, विशेषण, क्रिया

पद आणि अव्यय असे पांच भे

द आहेत.

स. वं. वं.

# नाम

प्र० नाम म्हणजे काय?

उ० इतर शब्दांशीं संबंध नसतां ज्या श ब्दापासून वस्तूचा बोध होतो त्या श ब्दास नाम असें म्हणावें उ० ईश्वर, मनुष्य, विद्या इत्यादि.

प्र० नामाच्या जाती किती आहेत?

उ० विशेष आणि सामान्य अशा दोन आहेत

प्र० विशेषण म्हणजे काय?

उ० कोणी एकेच वस्तूचें नाम तें विशे- ष नाम उ० परमेश्वर, गोविंदा, क बीर इत्यादि.

१११-८२५ १०



प्र० सामान्यनाम म्हणजे काय?

उ० जाती मात्राचें जें नाम ते उ० मनुष्य,पक्षी इत्यादि.

प्र० नामाला काय काय लागतें?

उ० लिंग, वचन, आणि विभक्ति, हीं लागतात

प्र० लिंगें किती आहेत?

उ० पुल्लिंग, स्त्री लिंग, आणि नपुंसक लिंग, अशीं तीन आहेत.

प्र० पुल्लिंगी नामें कोणतीं?

उ० पुरुष वाचक पदार्थांचीं जीं नामें, आणि ज्या नामाच्या पूर्वीं तो असा शब्द लागतो तीं उ० ईश्वर, गुरू, पर्वत इत्यादि.

प्र० स्त्री लिंगी नामें कोणतीं?

उ० स्त्री जातींच्या पदार्थांचीं जीं नामें व ज्यांच्या शेवटीं ईण, ई, हीं असतात. आणि ज्या नामांच्या पूर्वीं ती असा शब्द लागतो तीं. उ० कुळंबीण, भटीण, बायको, पोथी, शाळा, विद्या इत्यादि.

प्र० नपुंसक लिंगी नामें कोणतीं?

उ० जीं निर्जीव पदार्थांचीं नामें, व ज्यांच्या शेवटीं एँ हा स्वर असतो. आणि ज्यांच्या पूर्वीं तें असा शब्द लागतो तीं. उ० पुस्तक, मनुष्य, देवालय, तळें, घोडें इत्यादी.

प्र० वचनें किती आहेत?

उ॰ एकवचन आणि बहुवचन अशीं दोन आहेत. उ॰ मनुष्य, मनुष्यें.

प्र॰ विभक्ति किती आहेत?

उ॰ प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी आणि संबोधन अशा आठ आहेत.

प्र॰ पुरुष या नामास आठही विभक्ती लागल्या असतां प्रथमे पासून संबोधना पर्यंत प्रति विभक्तीचीं रूपें एकवचनीं आणि बहुवचनीं कशीं होतात तीं सांग?

| | उ॰ एकवचन | बहुवचन |
|---|---|---|
| प्रथमा. | पुरुष | पुरुष |
| द्वितीयाः | पुरुषास, | पुरुषांस. पुरुषांला. |

| | | |
|---|---|---|
| | पुरुषाला. पुरुषातें. | पुरुषांतें पुरुषांना. |
| तृ. | पुरुषानें पुरुषासीं | पुरुषांनीं. पुरुषांशीं. पुरुषांहीं. |
| च. | पुरुषाकारणें पुरुषासाठीं | पुरुषांकारणें पुरुषांसाठीं |
| पं. | पुरुषाहून | पुरुषांहून |
| ष. | पुरुषाचा | पुरुषांचा |
| स. | पुरुषांत | पुरुषांत |
| संबो. | हे पुरुषा | अहो पुरुषानों |

त्या नामाचें सामान्य रूप पुरुषा हें जाणावें. कारण सर्व विभक्तीचे प्रत्यय लागले असतां असें रूप होतें.

प्र. त्या प्रमाणें परमेश्वर, पंडीत, कोल्हा,

[library stamp]



सखा, कवी, माळी, गुरू, पेरू, दाहो, लाहो, भटीण, आंच, आंत, आड, मति, सुपारी, धेनु, ऊ, वस्तें, बायको, घर, मोतीं, पाणी, लिंबूं, तळें, ह्या शब्दांचीं रूपें लिहून दाखीव.

उ॰ शिष्यानें सर्व लिहून दाखवावीं.

## सर्वनाम

प्र॰ सर्वनाम म्हणजे काय?

उ॰ अवघ्या नामांच्या ठिकाणीं जो शब्द लागतो त्यास सर्वनाम असें म्हणतात.

प्र॰ सर्व नामें किती प्रकारचीं आहेत?

उ॰ पांच प्रकारचीं पुरुषवाचक सर्वनाम,

दर्शक सर्वनाम,        , संबंधी सर्व
नाम, प्रश्नार्थक सर्वनाम. आणि सा-
मान्य सर्वनाम.

प्र० पुरुषवाचक सर्वनामें कोणतीं?

उ० एकवचन. मी, तूं, तो. बहुवचन. आ-
म्ही, तुम्हीं, ते; मी हा प्रथम पुरुष,
तूं हा द्वितीय पुरुष, तो हा तृतीयपु-
रुष. असें जाणावें.

प्र० दर्शक सर्वनामें कोणतीं?

उ० हा तो हे ते इत्यादि.

प्र० संबंधीं सर्वनामें कोणतीं?

उ० जो, जे, इत्यादि.

प्र० प्रश्नार्थक सर्वनामें कोणतीं?

उ० कोण, काय, इत्यादि.

सं. भा. नं. ७०



प्र० सामान्य सर्वनामें कोणतीं?

उ० कांहीं, सर्व, अमुक, कोणी. इत्यादि.

प्र० सर्वनामास काय काय लागतें?

उ० नामा प्रमाणें लिंग, वचन आणि वि भक्ती, हीं लागतात.

प्र० मी, तूं, तो, हा, जो, कोण, काय, कांहीं, सर्व, अमुक, कोणी, ह्या सर्वनामांचीं अवघीं रूपें लिहून दाखीव

उ० शिष्यानें सर्व लिहून दाखवावीं.

## विशेषण

प्र० विशेषण म्हणजे काय?

उ० पदार्थाचा गुण किंवा दोष दाखवि णारा जो शब्द त्यास विशेषण अ म्हणावें.

प्र० विशेषणें किती प्रकारचीं आ-
हेत?

उ० दोन प्रकारचीं. गुण विशेषण
आणि संख्या विशेषण, उ०चा
गला, बरा, वाईट, असा, तसा,
हीं गुण विशेषणें, आणि एक,
दोन, पहिला, दुसरा, प्रत्येक,
दोघे, इत्यादि शब्दांस संख्या
विशेषणें असें म्हणावें.

प्र० त्या सर्व शब्दांचीं रूपें लिहून
दाखीव.

उ० शिष्यानें सर्व लिहून दाखवा-
वीं.

प्र० नाम, सर्वनाम, विशेषण, त्या-

उ॰ जीं दुसऱ्या शब्दांपासून उत्पन्न झालीं नसतात तीं. उ॰ झाड, लांकूड, घोंडा, माती, चांगला, भला, वाईट, इत्यादि.

प्र॰ समास कोणते व त्यांचे प्रकार किती आहेत?

उ॰ दोन शब्द एकत्र मिळून जें नाम किंवा विशेषण होतें त्यास समास म्हणावें. त्या समासाचे प्रकार पांच आहेत. अव्ययीभाव, तत्पुरुष, कर्मधारय, बहुव्रीहि, आणि द्वंद्व.

प्र॰ दोन शब्दांचा समास झाला असतां काय होतें?

उ० पहिल्या शब्दा पुढील विभक्ती जाती, आणि कोठें कोठें शब्दाच्या शेवटचा वर्णही जातो.

प्र० ह्या पांचही समासांची लक्षणें व व उदाहरणें सांग.

उ० १ अव्ययीभाव समास. षष्ठ्यंत नाम आणि अव्यय ह्यांचा समास होतो तो अव्ययीभाव. उ० त्याच्यावर त्यावर, त्याच्या आंत त्यात, त्याच्या मध्यें त्यामध्यें. घराच्यापासून घरापासून इत्यादि.

२ तत्पुरुष. ह्या समासाच्या प्रथम शब्दाच्या विभक्तीं प्रमाणें ह्यास नामें होतात; तृतीया तत्पु-

रुष. गज मोजणी. च॰ त॰ पोळ पाट. प॰ त॰ चोरभय. ष॰ त॰ रा जवाडा. स॰ त॰ रानडुकर इत्या

३ कर्मधारय. प्रथमांत विशेषण आणि विशेष्यनाम ह्यांचा जो समास तो कर्मधारय. उ॰ काळमाजर, तांबडमाती इत्यादि. संख्या वाचक पूर्व शब्द ज्या कर्मधारयास आहेत त्या वरून ए कवचन होतें त्यास द्विगु म्हण तात. उ॰ पंचपाळें, तिधारें इत्यादि.

४ बहुव्रीहि. तो आहे ज्यास, ज्याणें, ज्यासाठीं, ज्याहून, ज्या

चा, ज्यांत, ह्या अर्थी जो समास होतो त्यास बहुव्रीहि म्हणावें. उ॰ पांचखणी वाडा, चौबुर्जी किल्ला इत्यादि.

५ द्वंद्व. दोन तीन शब्दांचा संग्रह कर्तव्य असतां अनेक शब्दांचा संयोग होतो त्यास द्वंद्व म्हणावें. उ॰ मायलेंकरें, ह्या समासावरून एकवचनही होतें उ॰ शेलापागोटें, स्त्रीपुरु इत्यादि.

प्र॰ साधित शब्द कसे होतात?

उ॰ नाम, विशेषण, किंवां इतर शब्द, ह्यांवरून त्यात्या अर्थी

प्रत्यय होऊन नवीं नामें किंवा विशेषणें होतात, ते साधित शब्द जाणावे. त्यांतून मुख्य प्रकार सांगतो.

## साधितनामें.

| शब्द. | प्रत्यय. | साधितशब्द. |
|---|---|---|
| पाटील, | की, | पाटिलकी. |
| गुलाम, | गिरी, | गुलामगिरी. |
| चांगला, | पण, | चांगलेपण. |
| धीट, | आई, | धिटाई. |

## साधित विशेषणें.

| शब्द, | प्रत्यय. | साधितशब्द |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| भूक, | आळू, | भुकाळू. |
| राग, | ईट, | रागीट. |
| कोप, | इष्ट, | कोपिष्ट. |
| ताप, | अट, | तापट. |

# क्रियापद.

प्र० क्रियापद म्हणजे काय?

उ० कृति किंवा स्थिति या अर्थाचे जे शब्द त्यांस धातू किंवा क्रियापद असें म्हणावें. उ० पाहतो, बोलतो, चालतो. इत्यादि.

प्र० क्रियापदाचे प्रकार किती आहेत?

उ० चार, सकर्मक, अकर्मक, भा-

वी, आणि प्रयोज्य.
१ कांहीं एक कृतीचें जें फल त्याचा ज्याजवर साक्षात् संबंध होतो त्यास कर्म म्हणावें, त्याचा योग ज्या क्रियापदास होतो त्यास सकर्मक म्हणावें. उ० खातो, बोलतो इत्यादि.
२ ज्यास कर्माचा योग होत नाहीं तें अकर्मक. उ० राहतो, बसतो. कितीएकांचा प्रयोग कर्मसहित किंवां कर्मावांचून ही होतो त्यांस उभयविध असें म्हणतात. उ० मीं कवाड उघडतों, कवाड उघडतें इत्या०

३ क्रियेचा अर्थच कर्ता असतो, आणि त्याचा तृतीय पुरुषीं एकवचनीं मात्र प्रयोग होतो तें भावी. उ० उजाडतें, मळमळतें, वाटतें इत्यादि.

४ प्रयोज्य; धातूस व प्रत्यय लाविल्यानें बहुधा प्रयोज्य धातू होतात. उ० करवितों, देववितों इत्यादि. किती एकांचीं रूपें वेगळीं होतात. उ० येतो, आणतो इत्यादि.

प्र० प्रयोग म्हणजे काय आणि ते किती आहेत?

उ० प्रयोग म्हणजे भाषणाचे प्रका-

र, ते मुख्य, तीन आहेत. कर्त-
रि, कर्मणि आणि भावी.

प्र० कर्तरिप्रयोग, कर्मणिप्रयोग, आणि भावी प्रयोग म्हणजे काय?

उ० ज्यांत कर्त्याचें लिंग, वचन, पुरुष, क्रियापदास असतात तो कर्तरिप्रयोग. उ० तो काम करितो. ज्यांत कर्माचें लिंग, वचन, पुरुष, क्रियापदास असतात, त्यास कर्मणिप्रयोग म्हणावें. उ० त्यानें काम केलें. ह्याप्रमाणेंच अकर्मक किंवा भावी क्रियाप-

दाचा प्रयोग आला म्हणजे त्या
स भावी प्रयोग म्हणावें उ॰ म्यां
राहवें, म्यां असावें इत्यादि.

प्र॰ क्रियापदास किती अर्थ आ-
णि किती काळ आहेत?

उ॰ अर्थ चार आहेत; स्वार्थ, दा-
क्यार्थ, विध्यर्थ, आणि संश
यार्थ. मुख्य काळ तीन आहे-
त; भूत, भविष्य, वर्तमान. त्यां
चे भेद अनेक आहेत, ते शिष्या-
नें उदाहरणावरून समजावे.

प्र॰ त्या तीनही काळांचे अर्थ का-
य आहेत?

उ॰ चालता जो काळ तो वर्तमान

काळ, गेला जो काळ तो भूत-
काळ, आणि येणारा जो का-
ळ भविष्य काळ.

प्र० अस ह्या धातूचीं रूपें काळ
आणि पुरुष लागले असतां
कशीं होतात?

# स्वार्थ.

## वर्तमान काळ.

### प्रकार १

| | एकवचन. | बहुवचन. |
|---|---|---|
| प्रथमपुरुष. | मीं आहें. | आम्हीं आहों |
| द्वितीय० | तूं आहेस. | तुंम्हीं आहां. |
| तृ० | तो, ती, तें आहे. | ते, त्या, तीं, आहेत |

प्रकार २

| | | |
|---|---|---|
| प्र० | मीं होय. | आम्हीं होत. |
| द्वि० | तूं होस. | तुम्हीं व्हा. |
| तृ० | तो होय. | ते होत. |

प्रकार ३

रीतिवर्तमान.

| | | |
|---|---|---|
| प्र० | मीं असतों. | आम्हीं असतों. |
| द्वि० | तूं असतोस. | तुम्हीं असतां. |
| तृ० | तो असतो. | ते असतात. |

भूतकाळ.

प्रकार १

| | | |
|---|---|---|
| प्र० | मीं होतों. | आम्हीं होतों. |
| द्वि० | तूं होतास. | तुम्हीं होतां-होतेत. |
| तृ० | तो होता. | ते होते. |

| | |
|---|---|
| ती होती. | त्या होत्या. |
| तें होतें | तीं होतीं. |

प्रकार २

| | | |
|---|---|---|
| प्र० | मीं असें. | आम्हीं असूं |
| द्वि० | तूं अससं. | तुम्हीं असा. |
| तृ० | तो असे. | ते असत. |

भविष्यकाळ.

| | | |
|---|---|---|
| प्र० | मी असेन. | आम्हीं असूं. |
| द्वि० | तूं असशील. | तुम्हीं असाल |
| तृ० | तो असेल. | ते असतील. |

## शक्यार्थ.

वर्तमानकाळ. माझ्यानें असवतें इत्या

द्वि. भूतकाळ. माझ्यानें असवलें इत्या

द्वि. भविष्य काळ. माझ्यानें असवेल इत्यादि.

## विध्यर्थ

प्र० मी असूं किंवा म्या असावें. आम्हीं असूं किंवा आम्हीं असावें.

द्वि० तूं अस—ऐस. त्वां असावें. तुम्हीं असा. तुम्हीं असावें.

तृ. तो असो. त्यांनीं असावें ते असोत त्यांनीं असावें.

## संशयार्थ

### वर्तमानकाळ.

प्र० मी असतों. आम्हीं असतों.

द्वि॰ तूं असतास. तुम्हीं असतां.

तृ॰ तो असता. ते असते.

भूत काळ.

प्र॰ मी असलों. आम्हीं असलों

द्वि॰ तूं असलास. तुम्हीं असलां.

तृ॰ तो असला. ते असले.

---

प्र॰ ह्या प्रमाणें हो. कर, मार, बोल, वाच, आण, ह्या धातूंचीं रूपें सांग. आणि नकार लागला असतां रूपें कशीं होतात तीं सांग.

उ॰ शिष्यानें सर्व लिहून दाखवावीं.

प्र॰ धातूं पासून नामें, विशेषणें, आणि अव्ययें. कशीं होतात त्या-

चीं उदाहरणें सांग.

उ० धातुसाधित नामें. उ० कर धातु करणें, करणारा, करणार, कर्ता, विशेषणें. उ० केलें, केलेलें, करावें, करतांना, करीत. अव्ययें. करून, करूं इत्यादि.

## अव्यय.

प्र० अव्यय म्हणजे काय?

उ० ज्या शब्दावरून लिंग, वचन, विभक्ती लागत नाहींत त्यास अव्यय असें म्हणावें. उ० लवकर, खालीं, वर, इत्यादि.

प्र० अव्ययाचे प्रकार किती आहे-

त?

उ० चार आहेत.

१ क्रिया विशेषण अव्यय उ० इ
कडे, होय. होऊन. होतां, इत्यादि.

२ उभयांन्वयीं अव्यय. उ० आणि
आणखीं इत्यादि.

३ शब्दयोगीं अव्यय. उ० आंत,
बाहेर, पुढें, मागें, इत्यादि.

४ केवळ प्रयोगीं अव्यय. उ० हो,
आहा, आहाहा, अरे, आहो, इत्या.

## व्याकरण करण्याचीरी ति.

कोणी, विशेषण सर्वनाम, पुल्लिंगी

प्रथमेचें एक वचन.

एका, संख्या वाचक विशेषण पुल्लिंगी
सामान्य रूप.

गृहस्थाचे. सामान्य नाम; पुल्लिंगी षष्ठीचें
एक वचन.

बागेंत, सामान्य नाम, स्त्री लिंगी सप्तमी
चें एक वचन.

एक, संख्या वाचक विशेषण.

सिताफळाचें, सामान्य नाम, नपुंसक लिं-
गी षष्ठीचें एकवचन.

झाड, सामान्य नाम, नपुंसक लिंगी प्र-
थमेचें एकवचन.

होतें, अस धातु अकर्मक स्वार्थी भू-
त काळीं तृतीयपुरुषाचें एकवचन.

झाड हा कर्ता. कर्तरी प्रयोग.

त्यास, पुरुष सर्वनाम, तो ह्या तृतीय पुरुषाच्या द्वितीयेचें एक वचन.

उत्तम, विशेषण.

फळें, सामान्य नाम नपुंसक लिंगी प्रथमेचें बहु वचन.

येत, धातु साधित विशेषण.

असत, अस धातु अकर्मक स्वार्थी भूत काळीं तृतीय पुरुषाचें बहुवचन. फळें कर्ता कर्तरि प्रयोग.

राजानें, सामान्य नाम, पुल्लिंगी तृतीयेचें एक वचन.

विचार, सामान्य नाम, पुल्लिंगी प्रथमेचें एक वचन.

केला, करधातु सकर्मक, स्वार्थी भूतकाळीं तृतीयपुरुषाचें एकवचन, राजानें हा कर्ता. विचार हें कर्म. कर्मणि प्रयोग.

कीं, उभयान्वयीं अव्यय.

तें पुरुषसर्वनाम. नपुंसक लिंगी तृतीय पुरुषाच्या प्रथमेचें एकवचन

सिताफळाचें, सामान्यनाम नपुंसक लिंगी षष्ठीचें एकवचन.

झाड, सामान्यनाम, नपुंसक लिंगी प्रथमेचें एक वचन.

आपल्या, सामान्य सर्वनाम, आपण शब्दाचें सामान्यरूप.

यागांत, सामान्य नाम, पुल्लिंगी सप्तमीचें एक वचन.

आणून. धातु साधित अव्यय.

लावावें लाव धातु सकर्मक विध्यर्थी तृतीय पुरुषाचें एक वचन.

म्हणजे. उभयान्वयी अव्यय.

त्याचीं. पुरुष सर्वनाम, तृतीय पुरुषाचें नपुंसक लिंगी षष्टीचें बहुवचन. कर्मणि प्रयोग.

सर्व. सामान्य सर्वनाम. प्रथमेचें बहुवचन.

फळें. सामान्यनाम. नपुंसक लिंगी प्रथमेचें बहुवचन.

आपणास. सामान्य सर्वनाम, द्वितीये

चें एक वचन.

मिळतील, मिळ धातु अकर्मक स्वार्थी भविष्य काळीं तृतीय पुरुषाचें बहु वचन, फळें कर्ता अकर्म कर्तरी प्रयोग.

असा, प्रकारार्थक विशेषण, पुल्लिंगी प्रथमेचें एक वचन.

विचार, सामान्यनाम, पुल्लिंगी प्रथमेचें एक वचन.

करून, धातुसाधित अव्यय.

त्यानें. पुरुषसर्वनाम. तृतीय पुरुषाचें पुल्लिंगी तृतीयेचें एक वचन.

वृक्ष. सामान्यनाम. पुल्लिंगी प्रथमेचें एक वचन.

तेथून, क्रिया विशेषण अव्यय.

काढून, धातुसाधित अव्यय.

आपल्या, सामान्यसर्वनाम. आपणत्या-
चें सामान्य रूप.

बागेंत, सामान्यनाम, स्त्री लिंगी सप्तमी-
चें एकवचन.

नेऊन, धातुसाधित अव्यय.

लावतां, धातुसाधित अव्यय.

च, केवळप्रयोगीं अव्यय.

मरून, धातुसाधित अव्यय.

गेला, जा धातु, अकर्मक, स्वार्थी भूत
काळीं तृतीयपुरुषाचें एकवचन
वृक्षकर्ता. कर्तरिप्रयोग.

# तात्पर्य.

फार, विशेषण.

लोभ, सामान्यनाम, पुल्लिंगी प्रथमेचें एकवचन.

धरणें, धातुसाधित नाम.

हें, सामान्य सर्वनाम, नपुंसक लिंगी. प्रथमेचें एक वचन.

नाशाचें, नाम पुल्लिंगी षष्ठीचें एकवचन.

कारण, सामान्यनाम, नपुंसक लिंगी प्रथमेचें एक वचन.

जाणावें, जाण धातु सकर्मक विध्यर्थी सामान्य काळीं तृतीयपुरुषाचें एक वचन, कर्मणि प्रयोग.

त्याप्रमाणें शिक्षकानें मुलांकर वीं गोष्टी वाचून व्याकरण करावें.

## शिक्षारीति.

शिक्षकानें मुलांस हें व्याकरण शिकविण्याचा क्रम असा धरावा कीं पाठशाळेंतील नेमलेले वेळेस मुलें आलीं म्हणजे वर्गाच्या अनुक्रमाप्रमाणें दररोज त्यांस दाहा दाहा प्रश्न आणि उत्तरें याचा धडा सांगावा. त्या मुलांस तो धडा पाठ झाला म्हणजे शिक्षकानें त्यांस बोलावून निरनिराळे वर्ग उभे करावे आणि शिकण्याचें पुस्तक आपल्या हातीं घेऊन त्यांस प्रश्न करावे त्यांनीं

प्रश्नांचीं उत्तरें सांगावीं. शिक्षकानें मुलांस प्रश्न करावे ते असे.

शिक्षक. व्याकरण म्हणजे काय?

शिष्य. व्याकरण म्हणजे शुद्ध रीतीनें बोलणें आणि लिहिणें याची विद्या आहे.

त्या रीतीनें परिक्षा घेते समयीं शिक्षकानें लक्षांत ठेवावें कीं, मुलें जो धडापाठ करतात त्याचा अर्थ समजून त्यांनीं उत्तरें द्यावीं. कारण लहान मुलांचें लक्ष्य बहुधा पाठच करण्याकडे असतें अर्थाकडे असत नाहीं हें जांणून शिक्षकानें त्यांच्या मनांत जसा अर्थ येईल तसा यत्न करावा.

समाप्त